# स्वातंत्र्यलढा घटनाक्रम

**१८६९ :**

गव्हर्नर जनरल व्हाईसराय लॉर्ड मेयो (१८६९-७२). पोरबंदर येथे मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म. लाहोर येथे विद्यापीठाची स्थापना. सुएझ कालव्यातून दळणवळण सुरू.

**१८७० :**

लॉर्ड मेयोचा ठराव आर्थिक विकेंद्रीकरणाचे धोरण. गणेश वासुदेव जोशीकडून (सार्वजनिक काका) पुण्यात सार्वजनिक सभेची स्थापना.

**१८७२ :**

गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय लॉर्ड नॉर्थब्रुक (१८७२-७६). आंतरजातीय व आंतरजमाती विवाहास परवानगी देणारा कायदा संमत. सरदार रामसिंग यांची कुका चळवळ ब्रिटिशांकडून समाप्त.

**१८७३ :**

महात्मा ज्योतीराव फुलेंमार्फ़त पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना.

**१८७४ :**

सर्वसधारण ब्राम्होसमाजाची स्थापना (आंनदमोहन बोसमर्ाफत). बिहारमध्ये मोठा दुष्काळ.

**१८७५ :**

मॅडम ब्लाव्हटस्की व कर्नल ऑलकॉट यांच्यातर्फे अमेरिकेतील न्युयॉर्क येथे थिओसॉफिकल सोसायटी स्थापन. स्वामी दयानंद सरस्वतीकडून मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना. सर सय्यद अहमदखानमार्फ़त लाहोर येथे मोहमेडन ओरिएन्टल कॉलेजची स्थापना. प्रिन्स ऑफ वेल्सची भारतभेट

**१८७६ :**

गव्हर्नर जनरल व्हाईसरॉय लॉर्ड लिटन (१८७६-८०). म्हैसूर, मुंबई, मद्रास अवध, हैद्राबाद प्रांतात दुष्काळ **स्ट्रॅची आयोग,** भारतीय विज्ञान वर्धिनी (ीन्दािन् अस्स्ेच्ाित्ेन् फ्ेर

छुल्त्विवत्ेिन् ेफ श्च्एिन्च्ए) ची कलकत्ता येथे स्थापना (महिन्द्रालाल सरकार)

आनंद मोहन बोस व सुरेन्द्रनाथ बॅनर्जी कलकत्ता येथेनी ीन्दािन् अस्स्ेच्ाित्ेिन् ची स्थापना.

**१८७७ :**

लॉंड लिटनने व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट देशी वर्तमानपत्र नियंत्रण कायदा (१८७८) लागू केला. त्याने आम्र्स ॲक्ट करून भारतीयांना शस्त्रे बाळगण्याची परवनगी नाकारली. दिल्ली दरबार भरवला. दुसरे अफगाण युध्द (१८७८-८०).

**१८७८ :**

आय. सी. एस. परिक्षेची कमाल वयोमर्यादा २१ वरून १८ वर्षापर्यंत खाली आणली.

**१८७९ :**

वासुदेव बळवंत फडके यांचे बंड रामोशांचा उठाव.

**१८८० :**

आयात केलेल्या तयार कपडयवरील जकात कर रदद. गव्हर्नर जनरल व्हाईसरॉय लॉंड रिपन (१८८० ८४). टिळक, चिपळूणकर, आगरकर यांच्याकडून पुणे येथे न्यु इंग्लिश स्कूलची स्थापना. केशवचंद्र सेनामार्फ़त नवविधान समाजाची स्थापना. नारायण लोखंडेतर्फे मुंबई येथे भारतातील पहिली गिरणी कामगार संघटनेची (मिल हँड सोसायटी) ची स्थापना. दुष्काळ निवारण आयोग स्थापन.

**१८८१ :**

लोकमान्य टिळकांकडून केसरी (मराठी) व मराठा (इंग्रजी) वर्तमानपत्रांचे प्रकाशन सुरू. आगरकर केसरीचे संपादक, टिळक मराठीचे संपादक. लॉंड रिपनने व्हरनॅक्युलर प्रेस ॲक्ट रदद् केला. इंग्लंडमध्ये ग्लॅडस्टनचे उदारमतवादी सरकार. पहिला फॅक्टरी ॲक्ट संमत.

**१८८२ :**

अफगाणिस्तान युध्द समाप्त. ॲनी बेझंटकडून मद्रास प्रांतातील आडिसर येथे थिओसॉफिकल

सोसायटीची स्थापना. लॉर्ड रिपनने शिक्षण पध्दतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी हंटर कमिशन नेमले. महात्मा फुले यांची या कमिशनसमोर साक्ष. पंजाब विद्यापीठाची स्थापन. लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्थाचा कायदा पास केला.

**१८८३ :**

इल्बट बील वाद. सुरेन्द्रनाथ बॅनर्जीमार्फ़त कलकत्ता येथे अखिल भारतीय राष्ट्रीय परिषद (अल्ल् ीन्दाििन् णत्ेिनिल् छेन्फएरएन्च्ए) चे आयोजन.

**१८८४ :**

गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय लॉर्ड झफरिन (१८८४-८८). ॲलन ह्यूम इंडियन नॅशनल युनियनची स्थापना. सुब्रमण्यम अय्यर मद्रास महाजन सभेची स्थापना.

**१८८५ :**

डेक्कन एज्युकेशन सोसायटीची पुण्यात स्थापना. सर ॲलन ह्यूम व हेन्री कॉटन यांच्या प्रेरणेने राष्ट्रीय सभा स्थापना. राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन मुंबई येथे (व्योमेशचंद्र बॅनर्जी अध्यक्ष). पुण्यात कॉलरायाची साथ आल्याने मुंबईच्या गोपालदास तेजपाल संस्कृत पाठशालेत हे अधिवेशन झाले. ७२ प्रतिनिधी उपस्थित. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी अनुपस्थित. फिरोजशहा मेहता, बद्रुद्दीन तैय्यबजी व तेलंग यांच्या मार्फत बॉम्बे प्रेसिडन्सी असोसिएशनची स्थापना. पुण्यात फ़र्ग्युसन कॉलेजची स्थापना. बंगालमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाचा कायदा संमत. तिसरे बर्मा युध्द सुरू.

**१८८६ :**

राष्ट्रीय सभेचे कलकत्ता अधिवेशन. (दादाभाई नौरोजी अध्यक्ष). या आधिवेशनात सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांचा काँग्रेस प्रवेश. ब्रम्हदेशाचे भारतात विलिनीकरण सर आल्फ्रेड क्रॉप्ट भारतातील शिक्षणविषयक प्रगतीचा अहवाल सादर. आंध्रप्रदेशमध्ये राम्पांचा उठाव.

**१८८७ :**

राष्ट्रीय सभेचे मद्रास अधिवेशन. (बुद्रीद्दीन तय्यबजी). दादाभाई नौरोजी इंग्लंडमध्ये ब्रिटीश इंडिया असोसिएशनची स्थापना. न्या. रानडे सामाजिक परिषदेची स्थापना. आगरकरांचा केसरीच्या

संपादकचा राजीनामा.

**१८८८ :**

गव्हर्नर व व्हाईसरॉय लॉर्ड लान्स डाऊन (१८८८-१८९४). राष्ट्रीय सभेचे अलाहाबाद अधिवेशन (जॉर्ज यूल अध्यक्ष). आगरकरांनी सुधारक हे वर्तमानपत्र सुरु. त्यातील इंग्रजी विभागाचे लिखाण ना. गोपाळकृष्ण गोखले यांच्यामार्फत अलाहाबाद विद्यापीठाची स्थापना.

**१८८९ :**

राष्ट्रीय सभेचे मुंबई अधिवेशन (सर विल्यम वेडरबर्न अध्यक्ष). इंग्लंडच्या पार्लमेंटमधील उदारमतवादी सभासद चार्लस ब्रॅडला या अधिवेशनाला उपस्थित. प्रिन्स ऑफ वेल्यची दुसरी भारत भेट.

**१८९० :**

राष्ट्रीय सभेचे कलकत्ता अधिवेशन. (फिरोजशहा मेहता अध्यक्ष). बिरसा मुंडाच्या नेतृत्वाखाली छोटा नागपूर भागात मुंडांचा उठाव. न्या. रानडेमार्फत औद्योगिक परिषद आयोजित. राष्ट्रीय सभेची इंग्लंडमध्ये ब्रिटिश समिती स्थापन. सरकारी नोकरांना राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला हजर राहता येणार नाही असा आदेश.

**१८९१ :**

फॅक्टरी ॲक्ट व विवाहसंमती कायदा पारित. मणिपूरमधील उठाव. राष्ट्रीय सभेचे नागपूर अधिवेशन (पी.आनंदचार्लू अध्यक्ष) १४ एप्रिल महू येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म.

**१८९२ :**

शाहू महाराजांचा राज्याभिषेक. राष्ट्रीय सभेचे अलाहाबाद अधिवेशन (व्योमेशचंद्र बॅनर्जी अध्यक्ष) २६ मे इंडियन कौन्सिल ॲक्ट लागू. सरकारकडून निवडणूक तत्त्वाचा अवलंब व स्वीकार. गव्हर्नर जनरलच्या व गव्हर्नरच्या कौन्सिल सदस्य संख्येमध्ये वाढ. अनेक हिंदी सभासदांचा त्यात समावेश.

**१८९३ :**

राष्ट्रीय सभेचे लाहोर अधिवेशन (दादाभाई नौरोजी अध्यक्ष). शिकागो येथे जागतिक धर्म परिषद. स्वामी विवेकानंद यांनी हिंदुत्वावर प्रभावी भाषण केले. टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला. ॲनी बेझंटची बनारस येथे हिंदू सेंट्रल स्कूलची स्थापना केली.

**१८९४ :**

गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय लॉर्ड एल्जिन दुसरा (१८९४ १८९९)

**१८९५ :**

लो. टिळकांनी शिवजयंती सुरू केली.

**१८९६ :**

मद्रास, बिहार, वायव्य प्रांत, मध्यप्रदेश व मुंबई या प्रांतात भीषण दुष्काळ. सर हॉल आयोगाची स्थापना. न्या. गोखले, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी हिंदी अर्थव्यवस्थेत सुधारणा घडून आणण्यासाठी नेमलेल्या वेल्बी कमिशनसमोर साक्ष दिली.

**१८९७ :**

पुण्यात प्लेगची साथ. चाफेकर बंधूनी रँडचा खून केला. स्वामी विवेकानंदनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. राष्ट्रीय शैक्षणिक सेवा सुरू.

**१८९८ :**

गव्हर्नर जनरल व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन (१८९९ ते १९०५). छत्रपती शाहू महाराज वेदोक्त प्रकरण कोल्हापुरात सुरू. पंजाब, राजपुताना, बडोदा, कऱ्हाड, मुंबई प्रांतात दुष्काळ. मॅकडोनाल्ड आयोगाची नेमणूक. भारतीय चलन कायदा समंत.

**१९०० :**

वायव्य प्रांतांची निर्मीती. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मित्रमेळा या क्रांतिकारी संघनेची स्थापना केली. कलकत्ता कार्पोरेशन कायदा संमत.

**१९०१ :**

हिंदुस्तानच्या शिक्षण पध्दतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी सिमला परिषद. (लॉर्ड कर्झन अध्यक्ष) कर्झनने इंपेरिअल कॅडेट कोअरची स्थापना केली. रविंद्रनाथ टागोर यांनी कलकत्त्याजवळ बोरूर येथे शांती निकेतनची स्थापना केली.

**१९०२ :**

पोलिस खात्यातील अकार्यक्षता व भाषांतरांवरूनरष्टचारी नष्ट करण्यासाठी फ्रेझर कमिशन स्थापन. सर रॅले यांच्या अध्यक्षतेखाली युनिव्हर्सिटी कमिशन स्थापन. केरळमध्ये श्री.नारायण गुरू यांच्या नेत्वृत्वाखाली **एझवांची** चळवळ.

**१९०३ :**

बंगालचा ले. गव्हर्नर ॲन्ड्रयु फ्रेझरने कर्झनच्या आदेशावरून बंगालच्या फाळणीची योजना तयार केली. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदेनी जागतिक धर्म परिषद, ॲमस्टरडॅम येथे हिंदूस्थानातील उदार धर्म हा शोध निंबध वाचला.

**१९०४ :**

हिंदी विद्यापीठ कायदा संमत. प्राचीन स्मारक संरक्षण कायदा संमत. पतपेढया व सहकारी संस्था या विषयीचा कायदा संमत. स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मेळा संघटनेचे अभिनव भारतमध्ये रूपांतर केले. बंगालमधील पुसा येथे भारतीय कृषी संशोधन केंद्राची स्थापना. महात्मा गांधी : आफ्रिकेत दरबानजवळील फिनिक्स येथे टॉलस्टॉय आश्रमची स्थापना.

**१९०५ :**

ना. गोपाळकृष्ण गोखलेंनी पुणे भारत सेवक समाजाची स्थापना केली. जपानकडून रशियाचा पराभव. १९ जुलै बंगालची फाळणी (लॉंड कर्झनकृत). पूर्व बंगाल व आसाम हा नवा प्रांत निर्माण. गव्हर्नर पदी सर फूलर यांची नेमणुक. जमशेदजी टाटा यांनी जमशेदपूर येथे टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीची स्थापना केली. श्यामजी कृष्ण वर्मामार्फत इंग्लंडमध्ये इंडिया होमरूलची स्थापना. भारतमंत्री म्हणून मोर्ले यांची नेमणूक.

**१९०६ :**

गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय लॉंड मिंटो (१९०६-१९१०) राष्ट्रीय सभेचे कलकत्ता अधिवेशन (दादाभाई नौरोजी अध्यक्ष) स्वराज्याची प्रथमच मागणी. जहाल आणि मवाळ गटात एकी

साधण्याचा दादाभाईंचा प्रयत्न. वंगभंगाची चळवळ. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुणे येथे डिप्रेस्ड क्हास मिशनची स्थापना केली. बारिंद्र घोष व भूपेंद्रनाथ दत्त यांनी युगांतर वर्तमानपत्र सुरू. आगाखान व नवाब सलिमुल्ला यांच्याकडून इंडियन मुस्लिम लीगची स्थापना. ट्रान्सवाला येथे काळया कायद्याच निषेधार्थ गांधीजींचा सत्याग्रह. आगाखान यांच्या नेतृत्वाखालील सिमला शिष्टमंडळाची लॉड मिंटोला भेट व मुस्लिमाच्या स्वतंत्र्य मतदारसंघाची मागणी.

**१९०७ :**

राष्ट्रीय सभेचे सुरत अधिवेशन (रासबिहारी बोस अध्यक्ष) जहाल मवाळ वादामुळे नागपूर ऐवजी सुरत येथे अधिवेशन झाले. कॉग्रेसमध्ये फूट पडून जहाल व मवाळ गट वेगळे. स्वराज्य, शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार या चतु:सूत्री कार्यक्रमाची आखणी बंगालमध्ये क्रांतीकारी आंदोलने. महर्षी कर्वे हिंगणे येथे महिला विद्यालय. सरदार सिंराणा, मादाम कामा यांनी जर्मनीच्या इंटरनॅशनल सोशॅलिस्ट कॉन्फरन्स मध्ये भारताचे प्रतिनिधित्व.

**१९०८ :**

खुदीराम बोस व प्रफुल्लचंद्र चाकीने कलकत्त्याचा न्यायाधीश किंग्जफ़ोर्डवर बॉम्ब फेकण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळकांना अटक बॅ. जीना यांच्याकडे टिळकांचे वकिलपत्रे. टिळकांना ६ वर्षे काळया पाण्याची शिक्षा (मंडालेच्या तुरुंगात त्यांनी गीतारहस्य लिहिला.) वृत्तपत्र कायदा संमत. बिपीनचंद्र पाल व लाला लजपतराय लंडनमधील हिंदी राष्ट्रवाद्याच्या परिषदेला उपस्थित.

**१९०९ :**

मोर्ले मिंटो सुधारणा कायदा पारित. मुस्लिमांना स्वतंत्र मतदार संघ, कायदे मंडळात सभासदांची संख्या वाढविली. भारतमंत्री मोर्लेने स्थानिक स्वराज्य संस्थांचा अभ्यास करण्यासाठी विकेंद्रीकरण समितीची नेमणूक केली. इंडिया हाउस स्थापन. मदनलाल धिंग्राने सर विल्यम वायलीचा खुन केला.

**१९१० :**

गव्हर्नर जनरल व व्हाईसराय लॉड हार्डिग दुसरा (१९१०-१९१६) अलिपूर केसमध्ये अरविंद घोषांना अटक. इंडियन प्रेस ॲक्ट वृत्तपत्र व मुद्रणालयाकंडून रू. ५०० ते २००० पर्यंत जामीन मागण्याचा मॅजिस्ट्रेटला अधिकार.

**१९११ :**

गदर वृत्तपत्राची स्थापना (लाला हरदयाल सिंग). २२ मार्च सावरकारांना ५० वर्षाची शिक्षा. ११ जून वांची अय्यरने **तिन्नवेल्लीचा कलेक्टर ॲश** याचा गोळया घालून खून केला. कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना (शाहू महाराज). १२ डिसेंबर इंग्लडंचा पंचम्टश भा. जॉर्ज व राणी मेरीच्या आगमनाप्रीत्यर्थ दिल्ली येथे भव्य दरबार पंचम जॉर्जने बंगालची फाळणी रदद् करण्याची व ब्रिटिशांची राजधानी कलकत्त्याहून दिल्ली येथे नेणार असे जाहीर केले.

**१९१३ :**

बाबा गुरूदीप सिंगने कामागाता मारू हे जपानी जहाज भाडयाने कलकत्त्याहून घेऊन कॅनडाकडे रवाना केले. रासबिहारी बोसने लॉंड हार्डिगवर बॉम्ब फेकीचा प्रयत्न केला.

**१९१४ :**

जुलै म. गांधीजी भारतात परत. ॲनी बेझंटचा काँग्रेस प्रवेश व मद्रास प्रातांत **कॉमनविल व न्यु इंडिया** ही वृत्तपत्रे सुरू. मादाम कामांना अटक. केरळ प्रांतामध्ये नायर सेवा समाजाची स्थापना. (लॉंड एम्.पी.पिलाई मार्फत) महात्मा गांधीना कैसर-ए-हिंद ही पदवी बहाल. लोकमान्य टिळकांची सुटका. पहिले महायुध्द सुरू.

**१९१५ :**

भारतीय सरंक्षण कायदा पारित. हिंदु महासभेची स्थापना. ग्रामपंचायतीचा कायदा पास. ना. गोखले व फिरोजशहा मेहता यांचे निधन. म. गांधीनी साबरमती येथे पहिला सत्याग्रह आश्रम स्थापन केला. होमरूल लीगची स्थापना.

**१९१६ :**

गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय लॉंड चेम्सफ़ोर्ड १९१६-१९२१ कॉग्रेस व मुस्लिम लीग एकत्र लखनौ करार. जहाल व मवाळ गट ९ वर्षानंतर प्रथमच एकत्र. २८ एप्रिल लो. टिळक महाराष्ट्र्र होमरूळ लीगची स्थापना (बॅ. जोसेफ बॉप्टिस्टा अध्यक्ष) १ सप्टेंबर ॲनी बेझंट यांच्या होमरूल लीगला कॉग्रेसची मान्यता. बनारस येथे हिंदू विद्यापीठाची स्थापना. सॅडलर कमिशन पुणे येथे महिला विद्यापीठाची स्थापना.

**१९१७ :**

राष्ट्रीय सभेच्या कलकत्ता अधिवेशनाच्या श्रीमती ॲनी बेझंट पहिल्या महिला अध्यक्षा. म. गांधींच्या बिहारमधील चंपारण्य येथे सत्याग्रह. गांधीजींबरोबर डॉ. राजेंद्र प्रसाद व अनुग्राराण सिन्हा या सत्याग्रहात सहभागी. १० ऑगस्टची घोषणा भारतमंत्री मोन्टेग्यूची भारताला जबाबदार सरकार देण्याची इंग्लंडच्या पार्लमेटंमध्ये घोषणा. म्हैसूर प्रांतात सी.आर.रेड्डी प्रजा मित्र मंडळाची स्थापना. ब्राम्हणेत्तर चळवळीस वाढता पाठिंबा.

**१९१८ :**

रौलेट समितीचा अहवाल सादर. मोन्टेग्यू चेम्सफ़ोर्ड अहवाल प्रसिध्द. कॉग्रेसमध्ये वेगळा गट (सुरेन्द्रनाथ बॅर्नजी पुरस्कृत). अखिल भारतीय राष्ट्रीय उदारमतवादी संघाची स्थापना. म. गांधींचे अहमदाबाद येथील गिरणी कामगाराच्या व खेडा येथील शेतकऱ्यांच्या चळवळीस नेतृत्व. सत्याग्रह सभेची स्थापना. बी.पी. वाडीयमार्फ़त (मद्रास कामगार संघटनेची स्थापना. १० डिसेंबर जस्टीस सिडनी यांच्या अध्यक्षतेखाली रौलॅट ॲक्ट मंजूर.)

**१९१९ :**

रौलेट ॲक्ट (काळा कायदा) समंत. ६ एप्रिल रौलेट बिलाच्या निषेधार्थ हरताळ दिन. १० एप्रिल सैफद्दीन किचलू व सत्यपाल या कॉग्रेसच्या नेत्यांना अटक. तिसरे अफगाण युध्द सुरू. १३ एप्रिल राष्ट्रीय नेत्यांच्या अटकेच्या निषेधार्थ जालीयनवाला बाग येथे जमलेल्या जमावावर जनरल डायरचा बेछुट गोळीबार. यावेळी पंजाबचा ले. गव्हर्नर मायकेल ओडवायर. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट व्दिदल राज्य पध्दती, स्थानिक स्वराज्य संस्था प्रांतांच्या अधिकारात, लोकसेवा आयोगाची स्थापना, शिखांना स्वतंत्र मतदारसंघ. ऑक्टोबर जालियनवाला बाग हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी हंटर कमिशन स्थापन (३ इंग्रज, ३ भारतीय सदस्य). नोव्हेंबर : दिल्ली येथे अखिल भारतीय खिलाफत चळवळीचे अधिवेशन (म. गांधी अध्यक्ष). डिसेंबर : राष्ट्रीय सभेचे अमृतसर अधिवेशन (पं. मोतीलाल नेहरू अध्यक्ष) प्रतियोगी सहकारिता हे कॉग्रेसचे तत्कालिन धोरण. बाबासाहेब आंबेडकरांचे मूकनायक हे पाक्षिक सुरू, (शाहू महाराजांचे सहाय्य). कर्मवीर भाउराव पाटिल यांनी कार्ले ता. कराड जि. सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.

**१९२० :**

राष्ट्रीय सभेचे कलकत्ता खास अधिवेशन (लाला लजपतराय अध्यक्ष) असहकार चळवळ सुरू. म. गांधीनी एका वर्षात स्वराज्य मिळेल ही घोषणा केली. जालीयनवाला बाग हत्याकांडाच्या

निषेधार्थ महात्मा गांधीनी बोअर युध्दात मिळालेली कैसर-ए-हिंद पदवी व रविंद्रनाथ टागोर आणि सुब्रमण्यम अय्यर यांनी त्यांना मिळालेली सर ही पदवी ब्रिटीश सरकारला परत केली. सर सैय्यद अहमद खानमार्फ़त अलिगढ विश्वविद्यालय स्थापन. एन.एम. जोशीमार्फ़त अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेसची स्थापना, पहिले अधिवेशन मुबंईत. (लाला लजपतराय अध्यक्ष) इंडियन सायन्स कॉंग्रेसची स्थापना, २० एप्रिल :लोकमान्य टिळक लोकशाही पक्षाची स्थापना. २८ मे : हंटर कमिशनचा अहवाल प्रसिध्द. १ ऑगस्ट : लो. टिळकांचा मृत्यु. खिलापत चळवळ, (मौलाना शौकत अली व मोहम्मद अली) डिसेंबर : राष्ट्रीय सभेचे नागपूर अधिवेशन (चक्रवती विजय राधावाचार्या अध्यक्ष), स्वराज्य प्राप्ती हेच उदिष्ट असल्याचे जाहिर.

**१९२१ :**

भारतीय प्रथम जनगणना. गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय लॉंड रीडिंग (१९२१-१९२६). मलबार प्रांतात मोप्ला मुसलमानांचे हिंदुवर अत्याचार. १७ नोव्हेंबर : प्रिन्स ऑफ वेल्सची भारत भेट

**१९२२ :**

मॉटेन्यू यांचा राजीनामा. ५ फेब्रुवारी उत्तर प्रदेशातील चौकी जाळली. म. गांधी असहकार चळवळ बंद केल्याचे घोषित. १० मार्च गांधीजीना अटक व ६ वर्षे शिक्षा वल्लाभभाई पटेल बार्डोलीच्या सत्याग्रहाचे नेतृत्व. ठक्कर बाप्पामार्फ़त भिल्ल सेवा मंडळाची स्थापना. रविंद्रनाथ टागोर विश्वभारती विद्यापीठाची स्थापना. मोहोंजदडो येथील उत्खननाला प्रारंभ.

**१९२३ :**

टेरिफ बोंडची स्थापना मीठावरील कर लागू. १ जानेवारी मोतीलाल नेहरू, चित्तरंजनदास विठ्ठलभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पार्टीस निवडणुका लढविण्यास परवानगी. राष्ट्रीय सभेचे दिल्ली खास अधिवेशन (मौ. आझाद अध्यक्ष). या खास अधिवेशनात स्वराज्य पार्टीला निवडणुका लढविण्यास परवानगी. स्वराज्य पक्षाने निवडणुका लढवून १४५ जागा जिंकल्या.

**१९२४ :**

फेबुरवारी म. गांधीची सुटका. राष्ट्रीय सभा बेळगांव अधिवेशन (महात्मा गांधी अध्यक्ष). स्वराज्य वाद्यांची हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठी गोलमेज परिषदची मागणी. सरकारतर्फे रॉयल कमिशनची नेमणूक. तो आयोग पुढे सायमन कमिशन म्हणून भारतात आला. १९१९ च्या कायद्यान्वये व्दिदल राज्यपध्दतीची चौकशी करण्यासाठी सर मूडीमन आयोग स्थापन. डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांमार्फत बहिष्कार हितकारिणी सभेची स्थापना. आंध्र प्रदेशातील शेतकरी व आदिवासींच्या नेतृत्व करणाऱ्या अलूजी सितारामलू ला अटक व फाशी. कानपूर कटाचा खटला.

**१९२५ :**

राष्ट्रीय सभेचे कानपूर अधिवेशन (सरोजिनी नायडू अध्यक्ष). चित्तरंजन दास यांचे निधन. काकोरी मुझफ्फर अहमद यांच्याकडून भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना. गुरूव्दाराची व्यवस्था पाहण्याचा अधिकार शिरोमणी प्रबंधक कमिटीला देणारा कायदा संमत. विठ्ठलभाई पटेल यांची कायदेमंडळाची पहिले भारतीय अध्यक्ष म्हणून निवड.

**१९२६ :**

गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन (१९२६ ३१). हिंदी कायदेमंडळाची निवडणुकीत स्वराज्य पक्षाला अपयश. फॅक्टरी अ‍ॅक्ट दुरूस्ती संमत. ट्रेड युनियन कायदा संमत. स्वामी श्रध्दानंद यांचे हत्याकांड.

**१९२८ :**

सायमन कमिशनची भारतभेट. राष्ट्रीय सभेचे कलकत्ता अधिवेशन (मोतिलाल नेहरू अध्यक्ष) वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणारा ठराव संमत. शेतीची पाहणी करण्यासाठी रॉयल कमिशनची स्थापना. बार्डोली येथे वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा साराबंदीसाठी सत्याग्रह. १९ मे मुंबई येथे डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय परिषद (भारतीय घटना ठरविण्यासाठी) पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली समितीने नेहरू रिर्पोट तयार केला. डिसेंबर नेहरू रिर्पोटवर चर्चा करण्यासाठी कलकत्ता येथे सर्वपक्षीय सभा. मुस्लिम लीगचे दिल्ली येथे खास अधिवेशन. बॅ. जीना यांची १४ कलमी योजना.

**१९२९ :**

मार्च मुस्लिम लीगच्या अधिवेशनात काही अटीवर नेहरू रिर्पोटचा स्वीकार. ८ एप्रिल भगतसिंग व बटूकेश्वर दत्त यांनी पब्लिक सेफटी बिलाच्या निषधार्थ असेंब्लीत बॉम्ब फेकला. ३१ ऑक्टोबर १९२९ कॉंग्रेसचे लाहोर अधिवेशन (पंडित जवाहरलाल नेहरू अध्यक्ष). पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संमत. २६ जानेवारी व स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्याचा ठराव. मीरत कटाचा खटला सुरू.

**१९३० :**

२६ जानेवारी स्वांतत्र्यदिन म्हणून देशभर साजरा. २० मार्च सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याची घोषणा. १२ मार्च दांडी यात्रा गांधीजीच्या नेतृत्वाखाली इतर ७८ अनुयायासह साबरमती ते दांडी ३८५ किलोमीटर यात्रा. शिरोडा मीठ सत्याग्रह. एस.पी. जावडेकर, डॉ. आठल्ये, विनायक भुरकुटे, लागू. ६ एप्रिल दांडी येथे मिठाचा सत्याग्रह गांधीजीना अटक नंतर आब्बास तय्यबजी यांच्याकडे मिठाच्या सत्याग्रहाच्या चळवळीचे नेतृत्व. १८ एप्रिल सुर्यसेन, तारकेश्वर दस्तिदार यांची चित्तगांव शस्त्रसाठयावर धाड. २७ मे सायमन कमिशनचा रिर्पोट प्रसिध्द. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा नाशिक येथे काळाराम मंदिर सत्याग्रह. स्त्रियांना संपत्तीत वाटा, व अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देणारे कायदे संमत. प्रजामंडळाची स्थापना संस्थानी प्रजेच्या हक्कांसाठी चळवळ या चळवळीचे नेतृत्व जमनालाल बजाज, ओरिसा (सारंगधर दास) ताबनकोर (ॲनी मॅस्करनी), जम्मू काश्मीर (शेख महम्मद अबदुल्लाह), हैद्राबाद (स्वामी रामानंदतीर्थ) यांच्याकडे नोव्हेंबर पहिली गोलमेज परिषद (इंग्लंडमध्ये) कॉग्रेसचा बहिष्कार अलाहाबाद मुस्लीम लीगचे अधिवेशन स्वतंत्र पाकिस्तानची सर्वात प्रथम मागणी (मोहम्मद इक्बाल) २७ फेब्रुवारी अलाहाबाद पोलिस गोळीबार, (चंद्रशेखर आझाद हुतात्मा). गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय लॉंड विलींग्डन (१९३१ ते १९३६)

**१९३१:**

गांधी आयर्विन करार. राष्ट्रीय सभेचे कराची अधिवेशन (वल्लभभाई पटेल अध्यक्ष) दुसऱ्या गोलमेज परिाषदेत सामील होण्याचा निर्णय. २३ मार्च भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना फाशी. ७ सप्टेंबर दुसरी गोलमेज परिषद. महात्मा गांधी राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी. राजकीय प्रश्नावर तडजोड निघाली नाही. २८ डिसेंबर गांधीजी गोलमेज परिषदेहून परत.

**१९३२ :**

दुसरी असहकार (सविनय कायदेभंग) चळवळ. राष्ट्रीय सभेचे दिल्ली येथे खास अधिवेशन. (लोकनायक बापूजी अणे अध्यक्ष). ३ जानेवारी गांधीजींची कायदेभंगाची चळवळ परत सुरू करण्याचा आदेश. यंग इंडियाच्या जागी गांधीजींचे हरिजन हे साप्ताहिक सुरू. १६ ऑगस्ट कम्युनल रॅमसे मॅकडोनाल्ड ॲवराड ( अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ). २६ नोव्हेंबर : तिसरी गोलमेज परिषद कॉग्रेसचा बहिष्कार. फॉरेन रिलेशन ॲक्ट. अखिल भारतीय हरिजन सभेची स्थापना. डेहराहून येथे इंडियन मिलीटरी ॲकॅडमीची स्थापना.

**१९३३ :**

मार्च ब्रिटिश सरकारची श्वेतपत्रिका प्रसिध्द. प्रांताना स्वायत्तता व मध्यवर्ती व्दिदल कारभार

देण्याचे जाहीर. नोव्हेंबर गांधीजीची अस्पृश्यता निवारणाची मोहीम सुरू. म. गांधीना वर्ध्याजवळ सेवाग्राम या आश्रमासाठी जागा (जमनालाल बजाज यांच्याकडून). सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेण्यात आली. ११ नोव्हेंबर संयुक्त प्रवर समितीचा अहवाल. पाकिस्तानाच्या संकल्पनेची प्रथमच मांडणी.

**१९३५ :**

४ ऑगस्ट संयुक्त प्रवर समितीच्या अहवालास संसदेची मान्यता. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट हिंदुस्थान सरकारचा १९३५ चा कायदा संघराज्याची स्थापना, प्रतिक स्वायत्तता, फेडरल कोर्टाची स्थापना, व्दिदल राज्यपध्दती नष्ट करणे, ब्रम्हदेश भारतापासून वेगळा करणे. ही या कायद्याची वैशिष्टये.

**१९३६ :**

गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय लॉर्ड लिनलियगो (१९३६ ४३). अखिल भारतीय किसान सभेची स्थापना (अखिल भारतीय पातळीवर पहिली संघटना). लेबर पार्टी ऑफ इंडियाची स्थापना, (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून) जॉर्ज पंचमचा मृत्यू.

**१९३७ :**

१९३५ च्या कायद्यान्वये प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकीच्या कॉग्रेसला बहुमत. ११ पैकी ७ प्रांतात कॉग्रेसचे सरकार, २ प्रांतात इतर पक्षांच्या मदतीने संयुक्त सरकार तर पंजाब व बंगाल प्रांतात बिगर कॉंग्रेस. सरकार सुभाषचंद्र बोस व पंडित नेहरूंच्या प्रांतात कॉंग्रेस मंत्रीमंडळ तयार करण्यास विरोध. सावरकरांची सुटका.

**१९३८ :**

राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे सुभाषचंद्र बोस अध्यक्ष. संस्थानासह संपूर्ण भारतासाठी पूर्ण स्वराज्याची मागणी. **हिंदू मजदूर सेवक संघाची स्थापना.** (गुलझारीलाल नंदा व सरदार वल्लभाई पटेल यांच्याकडून).

**१९३९ :**

राष्ट्रीय सभेचे त्रिपुरा अधिवेशन. (अध्यक्ष सुभाषचंद्र बोस). सुभाषचंद्र बोसनी राष्ट्रीय सभा सोडून नवीन फॉरर्वड ब्लॉक पक्ष तयार केला. नेताजीनी राजीनामा दिल्याने डॉ. राजेंद्र प्रसाद यांची

राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानी निवड. ऑल इंडिया स्टेटस्पिपल्स कॉग्रेसचे जवाहरलाल नेहरू अध्यक्ष. सप्टेंबर : दुसरे महायुध्द सुरू. नोव्हेंबर: भारतीय जनतेला न विचारता भारतात ब्रिटनने युध्दात खेचल्याच्या निषेधार्थ काँग्रेस मंत्रीमंडळाचा राजीनामा.

**१९४० :**

राष्ट्रीय सभेचे रामगढ अधिवेशन (मौ. आझाद अध्यक्ष). कॉग्रेसची पूर्ण स्वातंत्र्याची मागणी व त्यासाठी कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा ठराव. मार्च मुस्लिम लीगचे लाहोर अधिवेशन मुस्लिम बहुसंख्य प्रदेशांची स्वतंत्र राज्ये बनविण्याचा ठराव मंजूर, (बॅ. जीना अध्यक्ष). १ ऑगस्ट ऑगस्ट घोषणा, विंस्टन चर्चिल. ऑक्टोबर राष्ट्रीय सभेची वैयक्तिक सत्याग्रह चळवळ सुरू (विनोबा भावे पहिले वैयक्तिक सत्याग्रही.). उधमसिंगने जालियनवाला बाग हत्याकांडास जबाबदार असलेल्या मायकेल ओडवायरचा खून केला.

**१९४१ :**

सुभाषचंद्र बोस भारतातून जर्मनीकडे रवाना. व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात वाढ. ७ डिसेंबर जपानचा पर्ल हार्बरवर हल्ला. आझाद हिंद फौजेची सिंगापूर येथे स्थापना. त्यासाठी रासबिहारी बोस यांना जपान व दक्षिणपूर्व आशियातील लष्करी अधिऱ्यांचे सहाय्य. फेब्रुवारी चीनचे प्रधानमंत्री चॅगकाय शेक यांची भारतभेट .

**१९४२ :**

२९ मार्च क्रिप्प्स योजना जाहीर. ८ ऑगस्ट चले जाव चळवळीचा मसुदा तयार करण्याचे काम पंडीत नेहरू. युसूफ मेहर अली छोडो भारतचे सूचक . मुंबईत गवालिया टॅक मैदानावरील राष्ट्रीय सभेच्या खास अधिवेशनात गांधीजीचा जनतेला करा किंवा मरा हा मंत्र दिला. ९ ऑगस्ट गांधीजी, पंडित नेहरू व इतर राजकीय नेत्यांना अटक. शिरीषकुमारचे नंदुरबार येथे बलिदान. महाराष्ट्ररात सातारा, उत्तर प्रदेशात बालिया, बंगालमध्ये तामलूक, ओरिसामध्ये तालचेर व कर्नाटकातील धारवाड येथे प्रतिसरकार स्थापन. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्फत शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना. चिमूर येथे पोलिस हत्याकांड. प्रो. भनसाली यांचे ६२ दिवसांचे उपोषण.

**१९४३ :**

गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय लॉंड वॅव्हेल (१९४३ १९४७). सिंगापूर येथे आझाद हिंद सेनेचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस यांच्याकडे. सुभाषचंद्र बोसनी सिंगापूर येथे हंगामी हिंदी सरकार स्थापन

केले. पंजाब व बंगाल प्रांतात दुष्काळाने ३० लाख लोक मृत्यूमुखी. मार्च राजाजी योजना (चक्रवर्ती राजगोपालचारी). लीगची राष्ट्रसभेची तडजोड घडवून आणण्यांचा त्यांचा प्रयत्न अपयशी. महर्षि कर्वे समता संघाची स्थापना. आगाखाना पॅलेस, पुणे येथे कस्तूरबा गांधीचा मृत्यू.

**१९४५ :**

जानेवारी भूलाभाई देसाई लियाकत अली योजना. १४ जून वॅव्हेल योजना. २५ जून सिमला परिषद (लॉंड वॅव्हेल अध्यक्ष). राष्ट्रसभेचे नेतृत्व मौ. आझाद, मुस्लिमलीग बॅ. जीना. १० जुलै मजूर पक्षाचे अटॅली इंग्लंडचे पंतप्रधान. आझाद हिंद सेनेच्या सैनिकांवर राजद्रोहाचे खटले दाखल. दिल्लीच्या लालकिल्यात चौकशी सुरू. पंडित जवाहरलाल नेहरू, भूलाभाई देसाई वकील म्हणून पुढे दुसऱ्या महायुध्दाचा शेवट. केंद्रिय कायदेमंडळासाठी निवडणूका.

**१९४६ :**

राष्ट्रीय सभेचे मीरत अधिवेशन (आचार्य कृपलानी अध्यक्ष). फेब्रुवारी मुंबई येथे भारतीय नौदलाचे बंड. लवकरच पूर्ण स्वातंत्र्य देण्याचे ॲटलींची पार्लमेंटमध्ये घोषणा. कॅबिनेट मिशन,. त्रिमंत्री योजना. सर पेट्रिक लॉरेन्स भारतमंत्री, सर स्टॅफर्ड क्रिप्स, व मि. अलेक्झांडर हिंदुस्तानात. १६ मे कॅबिनेट मिशन योजना. जुलै घटना समितीच्या निवडणुका. २४ ऑगस्ट हंगामी सरकारची स्थापना. पंडित नेहरू या मंत्रीमंडळाचे प्रमुख. मुस्लीम सहभागाची तयारी. ९ डिसेंबर घटना समितीची पहिली बैठक (२०७ सभासद उपस्थित ).

**१९४७ :**

गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय लॉंड लुईस माऊंटबॅटन (१३ मार्च ते १५ ऑगस्ट १९४७) २० फेबुरवारी जून १९४८ पूर्वी भारत सोडण्याची ॲटली यांची घोषणा. ३ जून माऊंटबॅटन फाळणीची योजना जाहीर. १२ जुलै हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचा कायदा संमत. १४ ऑगस्ट भारताची फाळणी व स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती. १५ ऑगस्ट भारताला स्वातंत्र्य.